## दिन विशेष...

१३१४ : संत नरहरी सोनार यांनी समाधी घेतली.

१८८४ : ज्ञानकोशकार श्रीधर व्यंकटेश केतकर यांचा जन्म झाला.

१९०७ : मूलद्रव्यांच्या परमाणूभाराचे संशोधक डिमेट्री मेंडेलिफ यांचे निधन झाले.

१९१७ : महर्षी आण्णासाहेब पटवर्धन यांचे निधन झाले.

महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी

RNI-MAHMAR/2023/89125

सेन्सेक्स ८२,२६९.७८ −२९६.५९ (०.३६%)
डॉलर ₹ ९१.९५

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३२ | १८ |
| दिल्ली | १९ | ०९ |
| मुंबई | ३२ | २२ |
| नागपूर | २९ | १६ |
| पुणे | ३१ | १३ |

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | सोमवार, दि. २ फेब्रुवारी २०२६ | वर्ष २ रे | अंक ८४ किंमत : ५ रु. | पाने ४


## सुविचार

विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी शिक्षणाचा पाया शाळेतच रचला जातो.

सुर्योदय - सुर्यास्त
स.-७:०५ संध्या-६:१७

## सोने – चांदी

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,६८,१९५/- ३,९५,०००/-

## केळी भाव

नवती : १३५५ ते १३६०
पिल बाग : ११०१ ते ११०२
कांदे बाग : ----

# देशाच्या कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचे वारे; भारत विस्तार एआय टूल सुरू करण्याची अर्थमंत्र्यांची घोषणा



वृत्तसंस्था । नवी दिल्ली

देशातील शेतकऱ्यांच्या आर्थिक उत्पन्नात वाढ करण्यासाठी. अल्पभूधारक शेतकऱ्यांची शेती अधिक फायदेशीर करण्यासाठी. शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी प्रशिक्षित मनुष्य आणि उच्च–गुणवत्तेच्या तंत्रज्ञानावर भर दिला जाईल. त्यासाठी देशाच्या कानाकोपऱ्यातील शेतकऱ्यांसाठी फायदेशीर ठरेल, असे बहुभाषिक भारत विस्तार एआय टूल सुरू करण्याची घोषणा केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी अर्थसंकल्पात केली आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी रविवारी (ता. १) लोकसभेत अर्थसंकल्प सादर केला.

देशाच्या कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमतेचे वारे वाहू लागले आहे. शेतकऱ्यांच्या कष्टाला कृत्रिम बुद्धिमतेची जोड मिळणार आहे. त्यासाठी केंद्र सरकार भारत विस्तार एआय टूलची म्हणजे ‘व्हर्च्युल इंटीग्रेटेड सिस्टम टू एक्सेस ॲग्रीकल्चर रिसोर्स’ या बहुभाषिक एआय टूल विकसित केले जाणार आहे. हे टूल देशातील प्रमुख भाषांमध्ये उपलब्ध करून दिले जाणार आहे.

त्यामुळे अडचणीच्या, नैसर्गिक आपत्तीच्या काळात शेतकऱ्यांना निर्णय घेण्यासाठी मदत होणार आहे. एआय टूलमुळे नैसर्गिक आपत्तीत शेतकऱ्यांच्या नुकसानीची जोखीम कमी होईल, असेही अर्थमंत्री म्हणाल्या.

### ➢ ५ लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या शहरांसाठी भरीव निधी

५ लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या टियर-२ आणि टियर-३ शहरांच्या सर्वांगीण विकासासाठी सरकारने ११.२ लाख कोटी रुपयांच्या भरीव निधीची तरतूद केली आहे. विशेष म्हणजे, आगामी २०२६-२७ या आर्थिक वर्षात ही रक्कम १२.२ लाख कोटी रुपयांपर्यंत वाढवण्यात येणार असल्याचे संकेतही देण्यात आले आहेत.

### ➢ अर्थसंकल्पातील काही महत्त्वाच्या घोषणा

**अर्थसंकल्पात घोषणा केल्याप्रमाणे आता आयकरात कुठलाच बदल करण्यात आला नाही. टॅक्स स्लॅब जैसे थे ठेवण्यात आले आहेत. पायाभूत सुविधा, एमएसएमई उद्योगांना चालना दिली जाणार, इलेक्ट्रॉनिक्स पार्ट्स सेमी कंडक्टरसाठी ४० हजार कोटींची तरतूद, प्रत्येक जिल्ह्यात उच्चशिक्षणासाठी मुलींसाठी वसतिगृह उभारले जाणार, पशुपालन दुग्धव्यवसायासाठीचे अनुदान वाढवले जाणार, ५०० एकात्मिक मत्स्य केंद्र उभारली जाणार, पुणे –मुंबईसह सात हाय स्पीड रेल्वे कॉरिडॉरचे सात मार्ग प्रस्तावित, मंदिरे असतील त्या शहरांचा विकास केला जाणार असून, यासाठी पाच हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.**

### अर्थसंकल्पाने अख्खा शेअर बाजार बरबाद, गुंतवणूकदारांचे १० लाख कोटी खाक

गुंतवणूकदार ज्याची आतुरतेने वाट पाहत होते तो २०२६ च्या अर्थसंकल्पाचा दिवस दलाल स्ट्रीटसाठी ब्लॅक संडे बनला. शेअर बाजारात गुंतवणूक करणाऱ्यांना बजेटमधून मोठा धक्का बसला आहे. सरकारने फ्युचर्स मार्केटमध्ये (पान २ वर)

### कर प्रणाली जैसे थे

➢ ० ते ४ लाख रुपये उत्पन्न– कर नाही
➢ ४ ते ८ लाख रुपये उत्पन्न– ५ टक्के कर
➢ ८ ते १२ लाख रुपये उत्पन्न– १० टक्के कर
➢ १६ ते २० लाख रुपये उत्पन्न– २० टक्के कर
➢ २० ते २४ लाख रुपये किंवा त्यावरील उत्पन्न–३० टक्के कर

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी गेल्या वर्षी सादर केलेल्या अर्थसंकल्पानुसार २०२५–२६ मधील कररचनेचे टॅक्स स्लॅब या प्रकारे होते. नव्या करचनेतील टॅक्स स्लॅबमध्ये १२ लाख रुपयापर्यंतचं उत्पन्न करमुक्त करण्यात आलं होतं. करदात्यांसाठी केलेल्या महत्त्वाच्या घोषणा कुठल्या?

➢ आयटीआर अपडेटसाठी आता ३१ मार्चपर्यंत मुदत
➢ १ एप्रिल २०२६ पासून देशात इन्कम टॅक्स ॲक्ट २०२५ अर्थात नवा प्राप्तीकर कायदा लागू होणार
➢ मूळ रिटर्न भरण्यासाठी पगारदारांसाठीची मुदत ३१ जुलै असेल तर नॉन ऑडिट बिझनेस आणि ट्रस्ट यांच्यासाठी ही मुदत ३१ ऑगस्टपर्यंत असेल. उत्पन्नाची माहिती न देणं, करचोरी करणं महागात पडणार आहे, करदात्याने जाणूनबुजून चुकीची माहिती दिली तर थकित कराच्या १०० टक्के दंड भरावा लागेल.
➢ परदेशी टूर पॅकेजवर आकारला जाणारा टीसीएस ५ ते २० टक्के इतका होता, जो आता २ टक्के करण्यात आला आहे. परदेश प्रवास स्वस्त होणार असून पर्यटकांवर कराचा बोजा कमी होणार आहे. नवीन कर नियमांमुळे कर प्रणाली सोपी होणार आहे. सामान्यांचा गोंधळ कमी होईल. १ एप्रिल पासून येणारे नवे नियम अशा पद्धतीने आणले आहेत की नागरिकांना कुठलीही अडचण न येता ते भरता येतील.

### काय स्वस्त?

- वैद्यकीय उपकरणे
- भारतात तयार होणारी कपडे
- कर्करोग, मधुमेहावरील औषधं
- क्रीडा साहित्य
- मोबाईल फोन
- अपघात विमा
- लिथियम आयन बॅटरी
- दुचाकी
- एलसीडी, एलईडी
- सौर पॅनेल
- ईव्ही वाहने, ईव्ही बॅटरी
- फ्रोझन फूड
- सीएनजी
- बायोगॅस
- परदेशी प्रवास
- परदेशातील शिक्षण
- चामड्याच निर्यात
- बीडी

### काय महाग?

- पीव्हीसी फ्लेक्स शीट
- दारु
- खनिज
- शूज
- सिगारेट
- भंगार

## थोडक्यात

### नगरमध्ये हनीट्रॅपचा थरार; गळ्याला कोयता लावून लुटले

**अहिल्यानगर ।** प्रेमाच्या बहाण्याने जाळ्यात ओढून निर्घृण लूट करणाऱ्या हनिट्रॅप टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) मोठा पर्दाफाश केला आहे. दोन तरुणींसह पाच जणांना अटक करण्यात आली असून चोरीचे दागिने खरेदी करणाऱ्या सराफालाही पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. या कारवाईत तब्बल २ लाख ८८ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. गोड बोलणं, थेट बारदरीत सापळा प्रेमाचा बहाणा करत तरुणीने फोनवरून फिर्यादीला गाठले. तिच्या बोलण्याला भुलून फिर्यादी थेट बारदरी (गर्भगिरी फाटा) येथे भेटीसाठी पोहोचला. मात्र तिथे आधीच दबा धरून बसलेल्या आरोपींनी गळ्याला कोयता लावून सोने–चांदीचे दागिने व रोकड लुटली.

### केंद्राकडून मेट्रो निओवर फुली?

**नाशिक ।** मेट्रो हा राज्याचा विषय असून, हा प्रकल्प खर्चिक आहे. संबंधित प्रस्ताव तपासणी करून राज्य सरकारकडे परत पाठविण्यात आला आहे,फअसे संदिग्ध उत्तर केंद्रीय गृहनिर्माण व नागरी कार्य मंत्रालयाने खासदार राजाभाऊ वाजे यांच्या प्रश्नाला दिले आहे. त्यामुळे नाशिकच्या मेट्रो निओवर फुली मारण्यात आल्याची चर्चा आहे.नाशिक मेट्रोबाबत खासदारांच्या प्रश्नावर केंद्रीय मंत्रालयाकडून कोणताही ठोस, कालमर्यादेसह प्रतिसाद मिळाला नाही. नाशिकच्या मेट्रो निओसंदर्भात लोकसभेत गुरुवारी (दि. २९) अतारांकित प्रश्न उपस्थित केला होता. त्यात खासदार वाजे यांनी नाशिक मेट्रो प्रकल्पाची घोषणा, सध्याची स्थिती, आवश्यक मंजुरी, निधी, अडथळे, मेट्रो निओचा निर्णय, तसेच २०२७ च्या सिंहस्थापूर्वी मेट्रो कार्यान्वित करण्याबाबत सरकारची भूमिका, अशा सहा अत्यंत महत्त्वाच्या मुद्द्यांवर स्पष्ट उत्तर मागितले होते.

### राष्ट्रवादी काँग्रेसवरच्या वक्तव्याबद्दल पीयूष गोयल यांची माफी

**नवी दिल्ली ।** केंद्रीय मंत्री आणि भाजपा नेते पीयूष गोयल यांनी एका मुलाखतीत प्रफुल्ल पटेल यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षपदी निवड झाल्याचा दावा केला होता. यानंतर महाराष्ट्राच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली होती. कारण शनिवारी (३१ जानेवारी) सुनेत्रा पवारांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली होती. त्यानंतर स्वत: प्रफुल्ल पटेल यांनी सोशल मीडियावर ट्विट करत त्यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या अध्यक्षपदी निवड झाली नसल्याचे स्पष्ट केले. पीयूष गोयल यांनीही ट्विटवरून माफी मागत या प्रकरणावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

# मुंबईतील वाढत्या वायुप्रदूषणाचा थेट परिणाम डोळ्यांच्या आरोग्यावर!

वृत्तसंस्था । मुंबई

**मुंबईतील वाढते वायुप्रदूषण आता केवळ श्वसनसंस्था किंवा हृदयविकारांपुरते मर्यादित राहिले नसून, त्याचा थेट आणि गंभीर परिणाम डोळ्यांच्या आरोग्यावर होत असल्याचे नेत्ररोग तज्ज्ञांनी स्पष्ट केले आहे. महानगरातील हवेतील सूक्ष्म प्रदूषणकण, विशेषत: पीएम २.५, पीएम १० आणि ऑझोनसारखे घातक वायू, डोळ्यांच्या पृष्ठभागावर सातत्याने परिणाम करत असल्याने मुंबईकरांमध्ये विविध नेत्रविकारांचे प्रमाण वाढताना दिसत आहे.**

अलीकडेच करण्यात आलेल्या एका स्थानिक आरोग्य सर्वेक्षणानुसार सुमारे ४४ टक्के मुंबईकरांनी प्रदूषणामुळे डोळ्यांमध्ये जळजळ, लालसरपणा, खाज, कोरडेपणा किंवा सतत पाणी येणे यांसारख्या तक्रारी असल्याचे नमूद केले आहे. विशेष म्हणजे, १८ ते ४५ वयोगटातील नागरिकांमध्ये या तक्रारींचे प्रमाण अधिक असल्याचे या सर्वेक्षणातून समोर आले आहे. दीर्घकाळ घराबाहेर राहणारे कर्मचारी, वाहनचालक आणि बांधकाम क्षेत्रातील कामगार यांना या समस्यांचा सर्वाधिक सामना करावा लागत असल्याचेही आढळून आले आहे. वैज्ञानिक अभ्यासांनुसार पीएम २.५, पीएम १० हे अतिसूक्ष्म प्रदूषणकण थेट डोळ्यांच्या पृष्ठभागावर साचतात. हे कण डोळ्यांच्या नैसर्गिक अश्रुपटलाला (पान २ वर)

### हैदराबाद विमानतळावर ९.५ कोटींचा गांजा जप्त

वृत्तसंस्था । हैदराबाद

हैदराबादच्या रेव्हेन्यू इंटेलिजेंस संचालनालयाच्या अधिकाऱ्यांनी अंदाजे ९.५ कोटी रुपयांचा २७.१५ किलो हायड्रोपोनिक गांजा जप्त केला आहे आणि सात जणांना अटक केली आहे.गुप्त माहितीच्या आधारे, बँकॉकहून आलेल्या चार भारतीय प्रवाशांना, इतर तिघांसह चेक–इन प्रक्रियेदरम्यान राजीव गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर रोखण्यात आले. तपासणीनंतर, ट्रॉली बॅगमध्ये लपवलेले हिरवट–तपकिरी रंगाचे ढेकूळ असलेले अनेक पॅकेट जप्त करण्यात आले.एकूण २७.१५ किलोग्रॅम वजनाचे जप्त केलेले पदार्थ गांजा असल्याची पुष्टी झाली आहे. या प्रकरणातील सर्व सातही आरोपींना अटक करण्यात आली आहे .

# केंद्रीय अर्थसंकल्पात महाराष्ट्राला नेमकं काय मिळालं?

## • मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी दिली माहिती



वृत्तसंस्था । मुंबई

देशाच्या अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी आज संसदेत देशाचे बजेट सादर केले. यानंतर या अर्थसंकल्पात महाराष्ट्राला काय मिळाले? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. यादरम्यान राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषद घेत अर्थसंकल्पात महाराष्ट्राच्या पदरात काय पडले? याबद्दल सविस्तर माहिती दिली आहे.

देशाचे पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वात देशाच्या अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी मांडलेला अर्थसंकल्प हा विकसित भारताच्या स्वप्नाकडे जाणारे एक दमदार पाऊल आहे, अशी प्रतिक्रिया राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. वाढत्या शहरीकरणाला नियोजनबद्ध करण्यासाठी पहिल्यांदाच ५ लाख पेक्षा जास्त लोकसंख्येच्या वरच्या शहरांचा एकात्मिक विचार या अर्थसंकल्पाने केला आहे. ज्याचा मोठा फायदा महाराष्ट्राला होईल, विशेषतः मोठ्या प्रमाणात गुंतवणूक आणि रोजगारनिर्मिती हे या अर्थसंकल्पाचे ध्येय दिसत आहे असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

फडणवीस पुढे बोलताना फडणवीस म्हणाले की, पायाभूत सुविधा क्षेत्रामध्ये १२ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक केंद्र सरकार करणार आहे. १० वर्षांपूर्वी वर्षाला एक लाख कोटींची गुंतवणूक आपण करायचो, त्यावरून एकाच वर्षात १२ लाख कोटींची गुंतवणूक हा एक महत्त्वाचा मुद्दा पाहाता येईल. शेती, पशू पालन, मत्स्य व्यवसाय आणि सिंचन या ४ क्षेत्रांसाठी भरीव तरतूदी आणि योजना, तसेच यात गुंतवणूक होईल यासाठी एक चांगला प्लॅन या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून सीतारमण यांनी घोषित केला आहे, असेही फडणवीस म्हणाले. प्रत्येक जिल्ह्यात महिलांसाठी हॉस्टेल ही योजना घोषित करण्यात आली आहे. आपली आरोग्य व्यवस्था बळकट करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याच्या रुग्णालयात कॅज्युअल्टी आणि ट्रॉमा सेंटर तयार करण्यात (पान २ वर)

# नाशिक कुंभमेळ्याला ‘बजेट’चा ठेंगा?

## • खासदारांची टीका, तर महाजनांनी सांगितला ‘फंडा’!

वृत्तसंस्था । नाशिक



**गोदावरी काठावर नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे २०२७ मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी सुमारे ३० हजार कोटींच्या आराखड्याच्या आधारे कामे सुरू झाली आहेत. रविवारी सादर झालेल्या केंद्रीय अर्थसंकल्पात कुंभमेळ्यासाठी कुठलीही तरतूद केली गेली नसल्याची टीका होत आहे. यावर कुंभमेळामंत्री गिरीश महाजन यांनी अर्थसंकल्पात कुंभमेळ्यासाठी वेगळी तरतूद करण्याची गरजच नसल्याचा दावा केला आहे.**

प्रयागराजच्या कुंभमेळ्यात उसळलेली गर्दी पाहता नाशिक–त्र्यंबकेश्वर कुंभमेळ्यात पाच ते सात कोटी भाविक सहभागी होण्याचा अंदाज आहे. हे लक्षात घेऊन राज्य व केंद्र सरकारने विविध योजनांची आखणी केली आहे. कुंभमेळ्यासाठी विविध प्रकल्पांचा समावेश असणाऱ्या सुमारे ३० हजार कोटींच्या आराखड्यानुसार कामांना चालना दिली जात आहे.

केंद्रीय अर्थसंकल्पात नाशिकसह उत्तर महाराष्ट्र व मुख्यत्वे सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी काही नवीन घोषणा होतात का, याकडे सर्वांचे लक्ष होते. परंतु, अर्थसंकल्पात कुंभमेळ्याचा कुठलाही उल्लेख नव्हता. अर्थसंकल्पाने नाशिकसह महाराष्ट्राची निराशा केल्याचे दिंडोरीचे खासदार भास्कर भगरे यांनी म्हटले आहे. अर्थसंकल्पात कुंभमेळ्याचा जसा विचार झाला नाही, तसाच पिकांना हमीभाव, युवकांना रोजगार, ग्रामीण भागातील शाळांची स्थिती याबाबत कुठलेही ठोस धोरण आखल्याचे दिसले नाही. केवळ निवडणुका (पान २ वर)

अर्थसंकल्पात कुंभमेळ्यासाठी तरतूद नसल्याच्या प्रश्नावर कुंभमेळामंत्री गिरीश महाजन यांनी स्पष्टीकरण दिले. कुंभमेळ्यासाठी अर्थसंकल्पात वेगळी तरतूद करण्याची गरज नसते. कारण संबंधित खात्याकडे प्रस्ताव देऊन कामे मंजूर करून घेण्याचे अधिकार मंत्र्यांना असतात. सुमारे सात हजार कोटी रुपये खर्चाच्या नाशिक परिक्रमा मार्गासाठी साडेतीन हजार कोटींचा निधी केंद्राने दिला आहे. नाशिक व उत्तर महाराष्ट्रात आवश्यक ती कामे आधीच सुरू झाल्याचे त्यांनी नमूद केले.

# भारताचा न्यूझीलंडवर दणदणीत विजय

## अर्शदीपच्या ५ विकेट्स अन् इशानचं शतक ठरलं गेमचेंजर



वृत्तसंस्था । तिरूवनंतमपुरम

**भारतीय संघाने पाचव्या आणि अखेरच्या टी–२० सामन्यात ४६ धावांनी दणदणीत विजय मिळवला. टी–२० विश्वचषकाच्या तयारीच्या दृष्टीने भारताने या सामन्यात प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला आणि संघाने धावांचा डोंगर उभारत आपली तयारी अगदी पक्की असल्याचं सिद्ध केलं. भारताकडून इशान किशनने शतकी खेळी केली आणि गोलंदाजीत अर्शदीप सिंगने ५ विकेट्स घेण्याचा पराक्रम केला.**

तिरूवनंतमपुरमच्या ग्रीनफिल्ड क्रिकेट स्टेडियममध्ये हा सामना खेळवला गेला. भारतीय संघाने या मालिकेतील सुरूवातीचे तिन्ही सामने एकतर्फी जिंकत मालिका आपल्या नावे केली होती. चौथ्या सामन्यात न्यूझीलंडने बाजी मारली. पण अखेरच्या सामन्यात भारताने शानदार विजय (पान २ वर)

## संपादकीय

### ध्रुवीकरणाचा सोस

समाज आधुनिक झाला आहे असे आपण म्हणतो. डिजिटल साक्षर झाला आहे असेही मानतो. हे मानताना जातीच्या आधारावर भेदभाव करण्याचा आजार आजही कायम आहे याकडे दुर्लक्ष करतो. पूर्वीइतके त्याचे प्रमाण जास्त नसेल किंवा आपल्याला तो दिसत नसेल म्हणून हा भेदभाव संपला असल्याचे मानायचे कारण नाही.जातींमुळे पोळल्या जाणाऱ्या आणि जातींमुळेच पोळणाऱ्या या दोन्ही वर्गातील एका गटांत जात जिवंत ठेवण्याची धारणा आजही कायम आहे, हे वास्तव आहे. शिक्षण संस्थांमध्येही जातींचा भेद पाळला जातो. त्याची अनेक उदाहरणे आहेत. काही ठिकाणी आत्महत्यांच्या घटना घडल्या आहेत. त्या रोखण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोग म्हणजे यूजीसीने नवे नियम केले आहेत.दुर्दैवाची बाब अशी की हेच नव्या संघर्षाचे कारण ठरू पाहत आहे. या नियमांच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात १२ याचिका दाखल झाल्या आहेत. तूर्त न्यायालयाने नियमांना स्थगिती दिली आहे. आता मार्चमध्ये पुढील सुनावणी होणार आहे. हा खरेतर कुलींग पीरिएड समजायला हवा. या काळात शांत आणि समंजसपणे विचार व्हावा. तथापि, तसे होण्याची चिन्हे नाहीत.किंबहुना प्रकरण अधिकच पेटवले जात आहे. उत्तर भारतात त्याची धग अधिक आहे. विद्यार्थ्यांच्या संघटनाच नाही तर वकिलांच्या संघटनाही नियमांच्या विरोधात आक्रमक झाल्या आहेत. काही सरकारी अधिकाऱ्यांनी नोकऱ्यांचा राजीनामा दिला आहे. विषय किती गांभीर्याने घेतला गेला आहे याची ही झलक आहे तसेच भविष्यात हा विषय किती तापणार आहे त्याचा इशारा आहे.शिक्षण संस्थांमधून नकारात्मक विचारांची शिदोरी घेऊन बाहेर पडणारे उद्याचे भारतीय नागरिक समाजात एकत्रितपणे आणि सलोख्याने राहतील का हा प्रश्न कोणालाच पडत नाही हे विशेष. त्यांच्या डोक्यात जर आताच भेदभाव संपवण्याच्या नावाने भेदभावाचेच विष पेरले गेले तर आपण समानतेच्या कितीही चांगल्या गोष्टी मांडल्या तरी नकारात्मकतेने भरलेल्या मनांमध्ये त्याला स्थान मिळण्याची शक्यता राहणार नाही. मुळात विद्यापीठांत तसेच महाविद्यालयांतील भेदभावाविरोधात मार्गदर्शक सूचना अगोदरच अस्तित्वात होत्या.सूचना होत्या, मात्र त्या पाळण्याचे कायदेशीर बंधन नव्हते. ते आता घातले गेले आहे. त्यासाठी एक नियमावली तयार केली गेली आहे. सर्व विद्यार्थ्यांना शिक्षणाची समान संधी उपलब्ध करून देणे आणि जात, वर्ग अथवा सामाजिक पार्श्वभूमीच्या अनुशंगाने होणारा कोणताही भेदभाव रोखणे हा यामागचा उद्देश आहे असे म्हटले जाते. या उद्देशाबद्दलच सामान्य किंवा ज्याला सवर्ण म्हटले जाते त्या वर्गात संशयाचे वातावरण आहे. समाजमाध्यमे आणि अनेक संघटनांचे नेते आणि सल्लागार यांनी या विषयावर प्रखर भूमिका मांडली आहे.काही प्रख्यात कवी मंडळी आणि कलाकारही परस्परांच्या विरोधात सोशल रोष व्यक्त करत आहेत. त्यांच्या मनात अनेक किंतू या नव्या नियमांविषयी आहेत. त्याचा आधार घेत विखारातून अधिक विखारीपणाकडे घेऊन जाणारा प्रचार केला जातो आहे. नव्या नियमांना आक्षेप घेणाऱ्यांचा प्रमुख मुद्दा असा आहे की संस्थांमध्ये या नियमांचा उपयोग सामान्य वर्गाच्या विरोधात केला जाऊ शकतो. त्याचा केवळ सामान्य वर्गातील विद्यार्थ्यांनाच नाही तर शिक्षकांनाही जाच होऊ शकतो. त्यामुळे सतत तणाव आणि संशयाचे वातावरण संस्थेत राहील.नियमांत जातीच्या आधारावर भेदभाव होत असेल तर त्या विरोधात तक्रार करण्याची तरतूद आहे.

# विकसनशील भारताचा विकसित दिशेने नेणारा दूरदृष्टीपूर्ण अर्थसंकल्प

## पायाभूत सुविधा, शेती, उद्योग व महिला सक्षमीकरणावर ठोस भर - महाराष्ट्रालाही मोठा लाभ

**प्रतिनिधी । जळगाव**



केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केलेला आजचा अर्थसंकल्प हा विकसनशील भारताला विकसित भारताकडे नेणारा दिशादर्शक व संतुलित अर्थसंकल्प आहे.

शहरीकरणाचे नियोजनबद्ध रूप, उद्योग व उद्योजकतेला प्रोत्साहन, तसेच गुंतवणूक व रोजगार निर्मितीसाठी खंबीर आणि दीर्घकालीन उपाययोजना या अर्थसंकल्पातून स्पष्टपणे दिसून येतात.

पायाभूत सुविधा क्षेत्रासाठी १२ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक करण्याचा निर्णय हा देशाच्या आर्थिक वाढीसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. यामुळे रस्ते, रेल्वे, दळणवळण, औद्योगिक वसाहती आणि लॉजिस्टिक्स क्षेत्रात मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होणार आहे.

शेती, पशुपालन, मत्स्यव्यवसाय आणि सिंचनासाठी करण्यात आलेल्या भरीव तरतुदी या ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देणाऱ्या ठरणार आहेत. शेतकरी, पशुपालक आणि मत्स्यव्यवसायाशी निगडित घटकांना या योजनांचा थेट लाभ मिळेल. लखपती दिदी योजनेच्या यशानंतर महिलांसाठी स्वतंत्र मॉल्स, उद्योग आणि व्यवसाय संधी निर्माण करण्याची घोषणा ही महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने ऐतिहासिक पाऊल आहे. महिलांच्या आर्थिक स्वावलंबनाला यामुळे नवी दिशा मिळेल.

उद्योग क्षेत्रात रोजगार निर्मिती हे मुख्य ध्येय ठेवून गुंतवणुकीला चालना देणारा हा अर्थसंकल्प आहे. याचा महाराष्ट्रालाही मोठ्या प्रमाणावर फायदा होणार असून, आगामी काळात राज्यात नव्या गुंतवणुका, उद्योग आणि रोजगाराच्या संधी निर्माण होतील.

> एकूणच, गुंतवणूक, रोजगार, शेती, महिला सक्षमीकरण आणि पायाभूत सुविधा या सर्व घटकांचा समतोल साधणारा हा अर्थसंकल्प असून विकसित भारताच्या संकल्पनेला साकार करणारा ठरेल.
>
> – ना. गुलाबराव पाटील, पालकमंत्री, जळगाव

## धरणगावात संत शिरोमणी गुरू रविदास महाराज जयंती उत्साहात साजरी




**प्रतिनिधी । धरणगाव**

मानवतेचा संदेश देणारे, समता–बंधुतेचे पुरस्कर्ते थोर संत शिरोमणी गुरू रविदास महाराज यांची जयंती धरणगाव शहरात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्ताने बस स्थानक परिसरातील संत रविदास महाराज यांच्या स्मारकास ह.भ.प. महंत भगवानदासजी महाराज, नगराध्यक्षा लीलाताई चौधरी, शिवसेना उपनेते गुलाबराव वाघ, माळी समाजाध्यक्ष व्ही. टी. माळी, नगरसेवक विनय भावे आदींसह उपस्थित मान्यवरांच्या हस्ते माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष भानुदास विसावे यांनी केले. यावेळी विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, प्रतिष्ठित नागरिक, नगरसेवक तसेच असंख्य समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी संत रविदास महाराजांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत त्यांच्या समतेच्या विचारांचे समाजात अनुकरण होणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले. कार्यक्रमादरम्यान संत रविदास महाराज, राजमाता अहिल्यामाई होळकर, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या विचारांना अभिवादन करण्यात आले. मानवता हाच खरा धर्म हा संदेश देत त्यांनी समाजातील भेदभाव दूर करून एकात्मतेचा मार्ग दाखविला, असे वक्त्यांनी नमूद केले. या जयंतीनिमित्त परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. समाजबांधवांनी एकत्र येत सामाजिक सलोखा जपण्याचा निर्धार व्यक्त केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिलीप वाघ सर यांनी तर आभार धर्मराज मोरे यांनी मानले.

## श्री इंद्रदेवजी महाराज आश्रमातील आयोजित श्रीमद् भागवत कथेचा आज शेवटचा दिवस

**प्रतिनिधी । चोपडा**

श्री श्री १००८ श्री महामंडलेश्वर डॉ. संत इंद्रदेवजी महाराज यांच्या जन्मोत्सवानिमित्त पारोळा तालुक्यातील सावखेडा येथे श्री इंद्रदेवजी महाराज आश्रमात श्रीमद् भागवत कथेचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच ५१ कुंडी लक्ष्मी यज्ञ देखील होत आहे. या यज्ञ सोहळ्यास पंचक्रोशिसह जिल्ह्यातून भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती राहणार असल्याचे सांगण्यात आले आहे. हा कार्यक्रम २७ जानेवारीपासून ते २ फेब्रुवारी पर्यंत आयोजित करण्यात आलेला आहे आज दि. २ रोजी कार्यक्रमाच्या समारोप होत आहे. तरी श्रीमद् भागवत कथेचा लाभ नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर घ्यावा, असे आवाहन आयोजकांमार्फत करण्यात आले आहे.

## मेहरुण येथील माता रमाई आंबेडकर माध्यमिक विद्यालयात प्रजासत्ताक दिन उत्साहात

**प्रतिनिधी । जळगाव**

**भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून संस्थेच्या संस्थापिका, अध्यक्ष यशोदाताई तायडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.**

यावेळी संस्थेचे सचिव शामकांत तायडे, संचालक प्रकाश तायडे , श्रीकांत तायडे , सुकेशिनी तायडे, भारतभूषण तायडे, मुख्याध्यापिका हर्षा पाटील, शाह, प्रदीप इंगळे, आदी मान्यवर उपस्थित होते. ध्वजारोहणानंतर ध्वजगीत, सामूहिक संविधान प्रस्ताविकतेचे वाचन करून शपथ घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी संगीतमय वातावरणात सांघिक कवाय सादर केले.



विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते सादर केली. इयत्ता दहावी आणि बारावीच्या होऊ घातलेल्या परीक्षेसाठी सर्वांनी कॉपीमुक्त अभियान राबवण्यासाठी सामूहिक शपथ घेतली. वाचन पूनम भंगाळे यांनी केले. यानंतर मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना खाऊ आणि शालेय गणवेश वाटप करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष यशोदा ताई तायडे यांनी प्रजासत्ताक दिनी सर्वांना शुभेच्छा दिल्यात. कार्यक्रम यशस्वीतेसाठी मुख्याध्यापिका हर्षा पाटील, पुनम भंगाळे,अनिल अत्तरदे, सुनील कचरे, शालू सैंदाणे, सुनील पाटील, नितीन सपकाळे, किशोर सैंदाणे, प्रभाकर खर्च, आदी शिक्षक कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## क्लासरूममधून थेट बाजारात : विक्रीतून व्यवस्थापन शिकण्यासाठी रायसोनीचे २०० विद्यार्थी रस्त्यावर

**प्रतिनिधी । जळगाव**

विद्यार्थ्यांना थिअरी मीट्स प्रॅक्टिस या संकल्पनेचा प्रत्यक्ष अनुभव देण्यासाठी जी. एच. रायसोनी इस्टीट्यूटच्या संचालिका प्रा. डॉ. प्रिती अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली जी. एच. रायसोनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट, जळगाव येथे रायसोनी मंडी २०२६ चे यशस्वी आयोजन करण्यात आले. दोन दिवस चाललेल्या या उपक्रमात एमबीएच्या २०० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. या अनोख्या उपक्रमात विद्यार्थ्यांनी क्लासरूमच्या बाहेर पडत थेट स्ट्रीटवर जाऊन प्रत्यक्ष प्रॉडक्ट सेलिंगचा अनुभव घेतला. लर्निंग बाय सेलिंग या संकल्पनेतून विद्यार्थ्यांनी टॉईज व इतर वस्तूंचे मार्केटिंग केले.

## पान १ वरुन

**मुंबईतील वाढत्या वायुप्रदूषणाचा......**

नुकसान पोहोचवतात. परिणामी 'ड्राय आय सिंड्रोम', कंजंक्टिव्हायटिस, सततची खाज, लालसरपणा आणि डोळ्यांतून पाणी येणे यांसारख्या समस्या उद्भवतात. तज्ज्ञांच्या मते, प्रदूषणामुळे निर्माण होणारा ऑक्सिडेटिव्ह स्ट्रेस आणि दीर्घकालीन दाह डोळ्यांच्या आरोग्यासाठी अत्यंत घातक ठरू शकतो.

**केंद्रीय अर्थसंकल्पात......**

येणार आहे. ज्यामुळे ग्रामिण आणि गरीब लोकांसाठी व्यवस्था तयार होईल. सर्व ग्रोथ हब्ससाठी ५ वर्षात प्रत्येकी ५ हजार कोटी देण्याचा एक कार्यक्रम आखण्यात आला आहे. याचा फायदा महाराष्ट्राला होईल, कारण आपण एमएमआर ग्रोथ हब, पुणे ग्रोथ हब आणि नागपूर ग्रोथ हब असे तीन ग्रोथ हब आपण नीती आयोगाच्या माध्यमातून तयार केले आहेत, असेही फडणवीस म्हणाले.

**भारताचा न्यूझीलंडवर......**

मिळवत मालिका ४-१ ने जिंकली.भारताने दिलेल्या २७२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना पहिल्या षटकात टीम सेफर्ट झेलबाद झाला. यानंतर फिन एलनने आपल्या उत्कृष्ट फटकेबाजीने सर्वांचं लक्ष वेधलं. एलनने ३८ चेंडूत ८ चौकार व ६ षटकारांच्या मदतीने ८० धावांची खेळी केली. तर रचिन रवींद्रने १७ चेंडूत २ चौकार, २ षटकारांसह ३० धावा केल्या. अक्षर पटेलने फिन एलनला झेलबाद करत संघाला महत्त्वाचा ब्रेकथ्रू मिळवून दिला. त्यानंतर न्यूझीलंडने विकेट्स गमावायला सुरूवात केली. ग्लेन फिलिप्सला ७ धावांवर अक्षरने माघारी धाडलं. यानंतर अर्शदीप सिंगने दोन वेळेस एका षटकांत २-२ विकेट्स घेतल्या आणि न्यूझीलंडचा डाव झटपट गुंडाळला. डॅरिल मिचेलने २६ धावांची खेळी केली. तर ईश सोधीने त्याच्या बॅटने महत्त्वपूर्ण धावा केल्या. ईश सोधीने १५ चेंडूत ३ षटकार व एक चौकार लगावत ३३ धावा केल्या. भारताकडून या सामन्यात अर्शदीपने ५ विकेट्स घेतल्या. तर अक्षर पटेलने ३ विकेट्स घेतल्या, तर रिंकू सिंग व वरूण चक्रवर्ती यांनी १-१ विकेट्स घेतल्या.

भारताने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. भारताने दोन षटकांत चांगली सुरूवात केली. पण संजू सॅमसन ६ धावा करत झेलबाद झाला. यानंतर अभिषेक शर्मा १६ चेंडूत ३० धावा करत माघारी परतला. यानंतर इशान किशन व सूर्यकुमार यादव यांनी ५६ चेंडूत १३७ धावांची भागीदारी केली, यासह संघाने २७१ धावांचा पाया रचला. इशानने ४३ चेंडूत ६ चौकार व १० षटकारांसह १०३ धावांची खेळी केली. तर सूर्यकुमार यादवने ३० चेंडूत ४ चौकार व ६ षटकारांच्या मदतीने ६३ धावा केल्या.

**नाशिक कुंभमेळ्याला......**

डोळ्यासमोर ठेवून सादर झालेला हा अर्थसंकल्प असल्याची टीका खा. भगरे यांनी केली. नाशिकचे खासदार राजाभाऊ वाजे यांनी कुंभमेळ्याच्या अनुषंगाने ठोस तरतुदीची मागणी केली होती. परंतु, नाशिकबाबत कुठलीही सकारात्मक बाब दिसून आली नसल्याचे सांगितले. हा अर्थसंकल्प नाशिक, महाराष्ट्र व सामान्य जनतेचा अपेक्षाभंग करणारा ठरल्याकडे खा. वाजे यांनी लक्ष वेधले. कुंभमेळ्यासाठी तयार केलेल्या आराखड्यात केंद्र सरकारकडून विविध कामांसाठी दिल्या जाणाऱ्या निधीचाही अंतर्भाव आहे. रेल्वे पायाभूत सुविधा, रामपथ, नाशिक विमानतळ, नाशिक परिक्रमा मार्ग (रिंग रोड), सांडपाणी प्रक्रिया केंद्र, त्र्यंबकेश्वरमध्ये प्रसाद योजनेंतर्गत तीर्थक्षेत्र विकास आदी कामांसाठी आठ ते १० हजार कोटींचा खर्च केला जाणार असल्याचे वरिष्ठ शासकीय अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले.

**देशाच्या कृषी क्षेत्रात......**

व्यापार करणाऱ्या गुंतवणूकदारांना मोठा धक्का दिला आणि एसटीटी शुल्कात वाढ करण्याची घोषणा केली आहे. अर्थमंत्र्यांनी फ्युचर्स अँड ऑप्शन्स म्हणजे ट्रेडिंगवरील कर वाढवण्याच्या घोषणेने बाजारचे कंबरडे मोडले. २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठीसादर केलेल्या अर्थसंकल्पाने शेअर मार्केट गुंतवणूकदारांची घोर निराशा केली आणि रविवारचा दिवस गुंतवणूकदारांसाठी ब्लॅक संडे ठरला. २३७०.३६ अंकांपेक्षा जास्त घसरला असून यामुळे शेअर बाजारातील गुंतवणूकदारांचे १० लाख कोटी रुपयांहून अधिक नुकसान झाले. शेअर बायबॅक आणि वर एसटीटीमध्ये वाढ लावण्याच्या अर्थसंकल्पातील घोषणेने शेअर बाजाराचा घात केला.

# उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली





**प्रतिनिधी । जळगाव**

**जळगाव येथे विविध संस्था, शैक्षणिक संस्था आदी ठिकाणी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निधन झाल्याने त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली वाहण्यात आली.**

महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री स्व.अजितदादा पवार यांचे विमान अपघातात दुःखद निधन झाले. आदरणीय दादांच्या जाण्याने सामाजिक,शैक्षणिक,सहकार, राजकीय क्षेत्राची कधिही भरून न येणारी हानी झाली आहे. राज्यातील जनता ही आपले प्रश्न अडीअडचणी,तक्रारी(समस्या) घेऊन दादांच्या दरबारी जात होते. व दादा जनतेची कामे मार्गी लावेपर्यंत त्या समस्येचा पाठपुरावा करीत असे. त्यांच्या या आपल्यातून अकाली निघून जाण्याने राज्यातील जनता पोरकी झाली असल्याची भावना जनसेवा विचारधारा फाऊंडेशन अध्यक्ष- निलेश बोरा यांनी श्रद्धांजली अर्पण करतांना व्यक्त केली. तसेच दादांची दैनदिन कामाची वेळ ही पहाटे ५ वाजेपासून सुरू व्हायची व दिवसाचे १६-१७ तास काम करून नागरीकांच्या प्रश्नांचा निपटारा जागेवरच करीत असे अशी दादांची राज्यभरात नाव लौकिक होते. व दादांची प्रशासनावर असलेली पकड ही वाखाणण्या जोगी होती. आजच्या राजकीय परिस्थितीत दादांसारखा शब्दाला जागणारा एकमेव नेता म्हणून दादांची ओळख राज्याला होती. दादांचे कार्य हे सामान्य जनतेच्या मनात कायम कोरलेले राहील.

तसेच शेखर देशमुख यावेळी आपल्या भावना व्यक्त करत दादा आज आपल्यातून निघुन गेले यावर विश्वास बसत नसल्याची भावना व्यक्त केली आहे.

यावेळी- उपस्थितांचे मन गहिवरून आले. सदर श्रद्धांजली कार्यक्रम दि.२८ रोजी रात्री-९ वाजता चौघुले प्लॉट हनुमान मंदिर चौक,जळगांव येथे जनसेवा विचारधारा फाऊंडेशन तर्फे घेण्यात आला. सर्वप्रथम- स्व.अजितदादा पवार यांच्या प्रतिमेस ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते- हिरालालबापू वाणी, डॉ.राजेंद्र बडगुजर यांच्या हस्ते माल्यार्पण करून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी- ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते-कैलास तिवारी, मधुकर चौधरी, राजेश सपकाळे, विजय सोनवणे, राजू मिस्तरी, सचिन ठाकूर, पप्पू पाटील, दिलीप सावळे, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या-श्रीमती शारदाताई बोरा, योगिताताई चौधरी, रेखाताई गवळी, उमेश भालेराव, बापू कोळी, शेखर देशमुख, महेश भालेराव, सागर सोनार, मानव चौधरी, नथ्थू बोरसे, संदिप पाटील, नाना महाजन, राजेश गवळी, सचिन चौधरी, सतिष चौधरी, कवि-प्रकाश पाटील,प्रल्हाद चौधरी, मुरलीधर सपकाळे, संजय वाणी, लक्ष्मण पाटील, रविंद्र.पी.चौधरी, महेश गायकवाड, नरेंद चौधरी, घनश्याम गवळी, विठ्ठल सावळे, कृष्णा गवळी, राजू कुमावत, रविंद्र मराठे,अमोल चौधरी, गणेश सोनार, गौरव मोरे, गजू कोळी, रुपेश चौधरी आदींनी स्व.अजितदादांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

**सै.नियाजअली भैय्या फौंडेशन**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे सर्वोसर्वा व सर्व वर्गांना समान न्याय देणारे स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या विमान दुर्घटनेत मुत्यू झाल्यामुळे शुक्रवारी संध्याकाळी ६.३० वाजता भिलपुरा चौकात सै. नियाज अली भैय्या फौंडेशन जळगावतर्फे श्रद्धांजली सभेचे आयोजन करून त्यात अजितदादांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

या प्रसंगी उपस्थित नागरिकांनी दोन मिनिटे हातात पेटत्या मेणबत्या घेऊन स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली वाहिली. या प्रसंगी अमर रहे, अमर रहे अजित दादा अमर रहे, एकच वादा अजित दादा, परत या, परत या अजित दादा परत, या अशा जोरदार घोषणा देण्यात आल्या. याप्रसंगी सै. अयाज अली नियाज अली यांनी उपस्थितांना अजितदादा यांच्याबद्दल सविस्तर माहिती देतांना अजितदादा कामाचा माणूस होता, दादांनी नेहमी सर्व लोकांना समान न्याय दिले. वंचित, गरीब, शेतकरी वर्गाला नेहमी कल्याण केले असून अजितदादांना महाराष्ट्र कधीही विसरणार नाही, अशा शब्दात भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

या प्रसंगी सै. नियाज अली भैय्या फौंडेशनचे सै अयाज अली नियाज अली, हाजी अब्दुल गनी, हाजी शकुर बादशाह, योगेश मराठे, रहेमत अली, कामिल खान, रवींद्र खैरनार, नितीन शिंपी, शेख शफी, नझीर जलाल, सलमान मेहबूब, हाजी अकबर खान, प्रकाश पाटील, शेख अय्युब, करीम खान, नासिर बागवान, नंदकुमार वाणी, जावेद बागवान, हाशिम कुरेशी, रफिक रहेमान, शाहिद कुरेशी, शेख आदिल, शेख रियाजुद्दीन, अब्दुल्लाह खान, झिशान हुसैन यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

**चिंचोली येथे अजित पवार यांना श्रद्धांजली**

चिंचोली ता. यावल : उपमुख्यमंत्री अजित पवार यांना ग्रामपंचायत व चिंचोली ग्रामस्थांच्या वतीने श्रद्धांजली वाहण्यात आली. सामाजिक कार्यकर्ते अशोक साठे व निवृत्त प्रा. सोळुंके, निवृत्त पो. अधिकारी प्रदीप सोळुंके यांनी अजित दादांच्या जिवनात घडलेल्या प्रसंगाची आठवण करून दिली.

श्रद्धांजली वाहण्यासाठी चिंचोली येथील सरपंचपती व माजी सरपंच अनिल सोळुंके, यावल प.स.चे माजी उपसभापती गोकुळ साठे, माजी जि.प. सदस्य किरण सोळुंके, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे वि.स.क्षे.प्रमुख अनिल साठे, उबाठाचे जिल्हा उपप्रमुख गोपाल चौधरी, माजी उपसरपंच निलेश सोळुंके, प्रभाकर साळुंखे, पिक, संस्थेचे चेअरमन देविदास कोळी, विकासो.चे चेअरमन भगवान सुर्यवंशी, तुकाराम पाटील, ग्राम प. सदस्य प्रदीप सोळुंके, शरद सोळुंके, हभप. पिंटु महाराज मुकेश साळुंखे, हभप. योगीराज महाराज, पिक संस्थेचे सचिव सुनील कोळी, दिनेश सोळुंके, दादा विजय पाटील, रतीलाल कोळी सुनील साठे, विकास जगताप कोतवाल ज्ञानेश्वर कोळी, होमगार्ड संजय साळुंखे, बंटी साळुंखे, बारकु धनगर, पंडित साळुंखे, संजय पाटील, धनराज पाटील, वासुदेव साठे, कैलास सोनवणे, बाळू पाटील, प्रेमचंद पाटील, प्रशांत सोळुंके आदी उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक – सागर काशिनाथ ओतारी **(मोबा.– ९९७००५३०६६)** व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी –३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव –४२५००१ येथे छापून शॉप नं. ई–१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव– ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
✲ **कार्यकारी संपादक – किशोर शंकर शिंपी** (✲ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७–२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

# बोरद येथे अखंड हरिनाम कीर्तन सप्ताह

## अध्यात्मिक ज्ञानाने तरुणांना मिळाली नवी दिशा

प्रतिनिधी । नंदुरबार

**बोरद ,ता. तळोदा, येथे समस्त ग्रामस्थ मंडळी व विठ्ठल रुक्मिणी भजनी मंडळ यांच्या वतीने आयोजित अखंड हरिनाम कीर्तन सप्ताह भक्ती, शिस्त, सामाजिक प्रबोधन आणि राष्ट्रनिष्ठेचा जागर करत उत्साहात संपन्न झाला.**

या कीर्तन सप्ताहाचे संपूर्ण नियोजन, व्यवस्थापन व अंमलबजावणी गावातील तरुणांनी पुढाकार घेऊन केले, ही बाब संपूर्ण कार्यक्रमाची विशेष ओळख ठरली.

आजच्या काळात तरुण पिढी मोबाईल, व्यसन, अपप्रवृत्ती व दिशाहीनतेकडे झुकत असल्याचे चित्र असताना, बोरद येथील तरुणांनी एकत्र येत धर्म, संस्कृती, राष्ट्रभक्ती आणि सामाजिक जबाबदारी यांचा सुंदर संगम साधणारा अखंड हरिनाम कीर्तन सप्ताह यशस्वी करून दाखवला. या उपक्रमातून तरुणाई ही समाजाची कमजोरी नसून परिवर्तनाची ताकद आहे हे प्रभावीपणे सिद्ध झाले.

या कीर्तन सप्ताहातून केवळ धार्मिक उपासना न करता समाजातील ज्वलंत प्रश्नांवर ठोस प्रबोधन करण्यात आले. कुटुंब प्रबोधन, सामाजिक समरसता, व्यसनमुक्ती, धर्म व परंपरांचे जतन, धर्मांतर व लव्ह जिहादाविरोधातील जनजागृती, राष्ट्र प्रथम ही भावना तसेच पर्यावरण संरक्षण या विषयांवर कीर्तनकारांनी अभ्यासपूर्ण, निर्भीड व ओघवत्या वाणीतून मार्गदर्शन केले.

कुटुंबसंस्था ही समाजाची पायाभरणी असून ती मजबूत नसेल तर समाज अधोगतीकडे जातो, हा विचार ठासून मांडण्यात आला. पालकांनी आपल्या मुलांवर संस्कार घडवावेत, कुटुंबात संवाद वाढवावा आणि परंपरांचे जतन करावे, असा संदेश देण्यात आला. जात, धर्म, पंथभेद विसरून सामाजिक समता व ऐक्य जपले गेले पाहिजे, तरच समाज सुदृढ बनेल, असे प्रतिपादन करण्यात आले.



तरुणांमध्ये वाढत चाललेल्या व्यसनाधीनतेवर तीव्र शब्दांत चिंता व्यक्त करण्यात आली. दारू, तंबाखू व अंमली पदार्थांमुळे तरुणांचे आयुष्य उद्ध्वस्त होत असून व्यसनमुक्त समाजनिर्मिती ही काळाची गरज असल्याचे सांगण्यात आले. तरुणांनी व्यसनांपासून दूर राहून शिक्षण, उद्योग, सेवा व राष्ट्रउभारणीसाठी स्वतःला वाहून घ्यावे, असे आवाहन करण्यात आले.

धर्म व परंपरांचे संवर्धन झाले नाही तर पुढील पिढी आपली ओळख गमावेल, याची जाणीव करून देत धर्मांतर व लव्ह जिहाद यासारख्या विषयांवरही समाजप्रबोधन करण्यात आले. समाजाने सजग, संघटित व जागरूक राहून आपल्या धर्म, संस्कृती व राष्ट्राचे रक्षण केले पाहिजे, असा ठाम संदेश देण्यात आला. ङ्गराष्ट्र प्रथमम ही भावना केवळ शब्दांत न राहता ती प्रत्येकाच्या आचरणात उतरली पाहिजे, असे विचार मांडण्यात आले.

यासोबतच पर्यावरण संरक्षणाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. वाढती वृक्षतोड, प्रदूषण व पाण्याचा अपव्यय यामुळे भविष्यात गंभीर संकट निर्माण होऊ शकते. त्यामुळे वृक्षसंवर्धन, जलसंधारण व निसर्गरक्षणाची जबाबदारी प्रत्येक नागरिकाने स्वीकारावी, असा संदेश कीर्तनातून देण्यात आला.


या अखंड हरिनाम कीर्तन सप्ताहात दररोज सकाळी काकडा आरती, हरिपाठ व धार्मिक कार्यक्रम पार पडले, तर सायंकाळी कीर्तनासाठी मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहत होते. शिस्तबद्ध नियोजन, स्वच्छता, सेवा व वेळेचे काटेकोर पालन यामुळे हा सप्ताह आदर्श ठरला. पाहुण्यांचे स्वागत, कीर्तनकारांची व्यवस्था, महाप्रसाद, स्वच्छता व शिस्त याची जबाबदारी तरुण सेवेकऱ्यांनी अहोरात्र मेहनत घेऊन पार पाडली.

शुक्रवार, दि. ३० जानेवारी २०२६ रोजी महाप्रसादाने सप्ताहाची सांगता झाली. मोठ्या संख्येने भाविकांनी श्रद्धेने महाप्रसादाचा लाभ घेतला. धार्मिकतेसोबत सामाजिक भान जागवणारा, तरुणांना योग्य दिशा देणारा व समाजाला एकत्र आणणारा हा अखंड हरिनाम कीर्तन सप्ताह बोरद गावासाठी प्रेरणादायी व अनुकरणीय ठरला, अशी भावना सर्व स्तरांतून व्यक्त करण्यात येत आहे. कालव्याच्या दिवसी ह.भ.प. जनार्दन महाराज राजपूत आरवेकर कीर्तन होते त्यांचा उपस्थिती गावातील तरुण मुलांनी गळ्यात तुलसीमाळा धारण केल्या. या यशस्वी आयोजनाबद्दल कीर्तनकार, तरुण कार्यकर्ते, आयोजक मंडळ, ग्रामस्थ, महिला मंडळ तसेच प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहकार्य करणाऱ्या सर्वांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.

---

# आजच्या युवा पिढीने शिवचरित्र आत्मसात करावे : शिवव्याख्याते रामेश्वर भदाणे

**चोपडा प.पू. साने गुरुजी आदर्श बालवाडीचा रौप्य महोत्सव उत्साहात**



प्रतिनिधी । चोपडा

**विदेशातील लोकांकडे मोठ्या आदर्श व्यक्तींचा अभाव असल्यामुळे ते काल्पनिक पात्रांमध्ये रममाण होतात. मात्र आपल्या देशात स्त्रीला मराठ्यांच्या देव्हाऱ्यातील दैवत मानणारे छत्रपती शिवाजी महाराज व संभाजी महाराजांसारखे महान आदर्श राजे लाभले आहेत. तसेच ज्या पुण्यात जयदेवाने गाढवाचा नांगर फिरवला, त्याच पुण्यात छत्रपतींनी सोन्याचा नांगर फिरवला. तलवारीपूर्वी नांगर हातात घेतल्यामुळेच महाराज हे रयतेचे राजा ठरले आहेत.**

तसेच राष्ट्रमाता जिजाऊ यांनी स्त्री,शेती व राज्यकारभाराचे संस्कार शिवरायांवर रुजवले आहेत. म्हणून आजच्या पिढीपर्यंत शिवचरित्र पोहोचणे अत्यावश्यक आहे .मुलींना केवळ गोष्टी सांगू नयेत, शिवचरित्र आपल्या मनात खोलवर रुजवावे ते वरवरच्या मेकअपसारखे नसावे, असे जोरदार प्रतिपादन शिवव्याख्याते रामेश्वर भदाणे(धुळे) यांनी केले. ते अमर संस्था संचलित बालमोहन विद्यालयात प.पू. साने गुरुजी आदर्श बालवाडीने आयोजित रौप्य महोत्सवी कार्यक्रमप्रसंगी बोलत होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान लोकनियुक्त नगराध्यक्षा नम्रता सचिन पाटील यांनी भूषविले तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत पाटील, उपाध्यक्ष मनोज चित्रकथी, सचिव नितीन जोशी,व्यवस्थापक राकेश पाटील,बालमोहन प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रदीप चौधरी, रंजना पाटील ,रेखा पाटील,बालमोहन उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्राचार्या प्रिती पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी अध्यक्षीय भाषणात नगराध्यक्षा नम्रता पाटील यांनी संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांतअण्णा यांनी लहानशा रोपट्यातून वटवृक्ष उभा केला आहे. या वटवृक्षाने अनेकांना उच्चस्तरीय पदापर्यंत पोहोचवले आहे. त्यामुळेच शाळेचा नावलौकिक जिल्हाभरात पोहचला असल्याचे सांगितले.

प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज, विद्येची देवी सरस्वती माता, परमपूज्य साने गुरुजी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. तद्नंतर संस्थेच्या वाटचालीत मोलाचे योगदान देणाऱ्या सर्व आजी-माजी शिक्षिका तसेच माजी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी माजी विद्यार्थिनी राची जैन व माजी विद्यार्थी डॉ.आकाश पाटील यांनी आपल्या आठवणींना उजाळा देत मनोगत व्यक्त केले. तसेच साने गुरुजी आदर्श बालवाडीच्या मुख्याध्यापिका रेखा नेवे यांनीही संस्थेच्या शैक्षणिक कार्याचा आढावा घेत प्रेरणादायी मनोगत सादर केले. सूत्रसंचलन मयुरेश्वर सोनवणे यांनी तर आभार प्रदर्शन राकेश पाटील यांनी केले. प्रसंगी बालमोहन विद्यालयातील सर्व विभाग प्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



---

## भगवान विश्वकर्मा वास्तुशास्त्राचे पहिले प्रणेते : आ. राम भदाणे

प्रतिनिधी । धुळे

श्री भगवान विश्वकर्मा हे देवांचे वास्तुकला तज्ञ म्हणून ओळखले जातात. वास्तुशास्ताचे पहिले प्रणेते आहेत. त्यांनी भगवान श्रीकृष्णासाठी द्वारका, पांडवांसाठी हस्तिनापूर व रावणासाठी सोन्याची लंका तयार केली. या नगरांच्या रचनेत, सौंदर्य, अचुकता व सुखसोयी यांचा मोठे सौंदर्य सामावलेले आहे, असे अभ्यासपुर्ण विचार आमदार राम भदाणे यांनी व्यक्त केलेत. धुळे शहरातील वलवाडीमधील श्री. विश्वकर्मा मंदिरात भगवान विश्वकर्मा जयंती उत्साहात साजरी झाली. श्री विश्वकर्मा आहेर-लोहार समाज बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेने कार्यक्रमाचे आयोजन केले. यावेळी आमदार राम भदाणे बोलत होते. आमदार अनुप अग्रवाल, माजी आमदार कुणाल पाटील, माजी कृषी सभापती अरविंद जाधव, पंचायत समितीचे माजी सदस्य अशोक चौधरी, एम.डी. पद्मश्री गृपचे पराग अहिरे आदी उपस्थित होते. आमदार भदाणे म्हणालेत, श्री विश्वकर्मा संस्थेमार्फत महत्वपुर्ण उपक्रम राबविले जातात. हे विश्वकर्मा कौतुकास्पद आहे.

---

# संतुलित जीवन हाच यशाचा खरा मंत्र; पालक मेळाव्यात माई प्रमिला गिरी यांचे प्रभावी मार्गदर्शन

प्रतिनिधी । चोपडा



**पंकज शैक्षणिक व सामाजिक संस्था संचलित पंकज विद्यालयात महिलांच्या उपस्थितीत महिला- पालक मेळावा उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दीपाली बोरोले होत्या.**

या मेळाव्यात नित्यानंद अनुभूती संस्थेच्या संस्थापिका व अध्यात्मिक सेना महाराष्ट्र राज्य महिला अध्यक्ष प्रमिला गिरी (माई) यांनी संतुलित जीवन, यशस्वी जीवन या विषयावर अत्यंत प्रेरणादायी व्याख्यान दिले. संतुलित विचार, सकारात्मक दृष्टीकोन व शिस्तबद्ध दिनचर्या यांचा जीवनातील अनन्यसाधारण महत्त्व त्यांनी आपल्या अभ्यासपूर्ण व अनुभवसंपन्न मार्गदर्शनातून उलगडून सांगितले. माई म्हणाल्या की, जीवनात संकटे, अपयश किंवा नकारात्मक घटना अपरिहार्य असतात; मात्र अशा परिस्थितीतही संयम राखून योग्य निर्णय घेणारे मनच खऱ्या अर्थाने बलवान व निरोगी असते. मन व शरीर यांचा योग्य समतोल साधल्यास यश, समाधान व आर्थिक स्थैर्य आपोआप प्राप्त होते, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. आजच्या आईंनी संतुलित जीवनाची सुरुवात स्वतःपासून करावी, असे आवाहन करताना त्या म्हणाल्या की, टीव्ही, मोबाईल, रील्स, पार्टी किंवा निरर्थक गप्पांमध्ये वेळ वाया घालविल्यास त्याचा थेट परिणाम मुलांच्या मानसिक जडणघडणीवर होतो. पुढील पंधरा वर्षांनंतर मानसिक आजारांनी ग्रस्त मुलांची जबाबदारी आईवरच येऊ शकते, याची जाणीव ठेवून पालकांनी आपला वेळ, सवयी व विचार संतुलित ठेवणे अत्यंत गरजेचे आहे. संस्थेचे अध्यक्ष भैय्यासाहेब पंकज बोरोले यांनी धकाधकीच्या जीवनात पालकांनी मुलांसोबत वेळ घालवावा, त्यांच्या समस्या समजून घ्याव्यात व संवादातून त्यावर उपाय शोधावेत, असे सांगितले. विद्यालयाचे मुख्याध्यापक एम. व्ही. पाटील यांनी सतत नवनवीन गोष्टी शिकत राहणे, सकारात्मक छंद जोपासणे व परिवाराशी नियमित संवाद साधणे हाच संतुलित जीवनाचा पाया असल्याचे नमूद केले.



कार्यक्रमात प्रमुख पाहुणे व मान्यवरांचा सन्मान पुस्तक भेट देऊन करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभाग प्रमुख मीना माळी यांनी केले. पाहुण्यांचा परिचय जयश्री हिंगे यांनी करून दिला. सूत्रसंचलन छाया बारी व सूत्र संचलन योगिता कोळी यांनी प्रभावीपणे केले.

---

## उपमुख्यमंत्री अजित पवारांना श्रद्धांजली: आठवणींना उजाळा

प्रतिनिधी । शिरपूर

उपमुख्यमंत्री अजित पवार यांना शिरपूर येथील जनक विला, आमदार कार्यालयाच्या प्रांगणात माजी मंत्री आमदार अमरीश पटेल, आमदार काशिराम पावरा व मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत शिरपूर भाजपतर्फे श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी आमदार अमरीश पटेल यांनी स्व. अजित पवार यांच्या बद्दलच्या अनेक आठवणींना उजाळा दिला.

ज्येष्ठ नेते खासदार शरद पवार व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी जिव्हाळ्याचे, कौटुंबिक व सहानुभूतीपूर्ण नाते होते. निर्णयक्षमता आणि विकासाभिमूख दृष्टिकोनासाठी ते परिचित होते, या शब्दात त्यांनी भावना व्यक्त करीत भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी भाजप माजी जिल्हाध्यक्ष बबनराव चौधरी, डॉ. तुषार रंधे, के. डी. पाटील, देवेंद्र पाटील, सुभाष कुलकर्णी, नरेंद्रसिंग राजपूत आदी उपस्थित होते.

---

# पारोळा येथील सागर बघुरे यांना उत्कृष्ट ग्रंथालय सेवक पुरस्कार

प्रतिनिधी । पारोळा



**जिल्ह्यात पारोळा ता. पारोळा येथे दिनांक १८.०१.२०२६ रोजी नाशिक विभाग ग्रंथालय संघ व जळगाव जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघ जळगाव यांचे सयुंक्त विद्यमाने अधिवेशन संपन्न झाले.**

या वार्षिक अधिवेशनात जळगाव जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघ व कै. उत्तम नामदेव पाटील सार्वजनिक वाचनालय टिटवी, ता. पारोळा, जि. जळगाव यांचे सयुंक्त विद्यमाने दशरथ गजमल पाटील यांचे स्मरणार्थ उत्कृष्ट ग्रंथालय सेवक पुरस्कार हा सागर भिमराव बघुरे यांना प्रदान करण्यात आला असून ते श्रीनिवासभाऊ वाचनालय पारोळा येथे कार्यरत आहे. या प्रसंगी आमदार अमोल पाटील, नगराध्यक्ष चंद्रकांत पाटील, जळगाव जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष सतीश पाटील, संचालक श्री. गाडेकर, राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष गजानन कोटेवार, संघाचे उपाध्यक्ष रवींद्र पाटील, नाशिक विभाग संघाचे अध्यक्ष दत्ता परदेशी व सर्व संचालक मंडळ ग्रंथालय संघ जळगाव उपस्थित होते.

---

# कुष्ठरोग निर्मूलनासाठी ‘स्पर्श’ जनजागृती

## ‘कुसुम’ विशेष मोहीम १३ फेब्रुवारीपर्यंत जिल्हाभर व्यापक उपक्रम

प्रतिनिधी । नंदुरबार

**राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त दि. ३० जानेवारी हा कुष्ठरोग निवारण दिन म्हणून साजरा केला जातो. या अनुषंगाने दि. ३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत नंदुरबार जिल्ह्यात राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमाअंतर्गत मस्पर्शफ कुष्ठरोग जनजागृती अभियान तसेच कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र अंतर्गत मकुसुमम विशेष मोहीम डॉ मित्ताली सेठी मा. जिल्हाधिकारी व नमन गोयल मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात येणार आहे.**

भेदभाव समाप्त करू या, सन्मानाची वागणूक देऊ या हे स्पर्श जनजागृती मोहीम २०२६ चे घोषवाक्य असून, कुष्ठरोगाविषयी असलेले गैरसमज दूर करणे, भेदभाव कमी करणे, लवकर निदान व वेळेवर उपचाराचे महत्त्व समाजापर्यंत पोहोचवणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. कुष्ठरोगाविषयी समाजात अजूनही भीती, गैरसमज व कलंक दिसून येतो. याचा परिणाम रुग्णांच्या सामाजिक, आर्थिक, कौटुंबिक व व्यावसायिक जीवनावर होतो. ही परिस्थिती बदलण्यासाठी स्पर्श अभियानांतर्गत शाळा, महाविद्यालये, महिला बचत गट, तरुण मंडळे, बाजारपेठा, आरोग्य मेळावे, नुक्कड नाटके, प्रभात फेऱ्या, मॅरेथॉन, वकृत्व-चित्रकला-रांगोळी स्पर्धा व प्रदर्शन तसेच माध्यमांद्वारे व्यापक जनजागृती करण्यात येणार आहे. याच कालावधीत शाश्वत विकास ध्येय २०२७ अंतर्गत शून्य कुष्ठरोग प्रसार साध्य करण्यासाठी कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र (कुसुम) ही विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेद्वारे नियमित सर्वेक्षणातून वंचित राहणारे घटक जसे की स्थलांतरित कामगार, बांधकाम मजूर, चिरेखाण कामगार, कारखान्यातील कामगार, कारागृहातील कैदी, आश्रमशाळा व वसतिगृहातील विद्यार्थी, वीट भट्टी कामगार आदींचे विशेष सर्वेक्षण करण्यात येणार आहे. नंदुरबार जिल्ह्यातील ३१२ अतिसंवेदनशील भागामध्ये ७५१८७ नागरिकांची २२३ टीम द्वारे आशा व पुरुष स्वयंसेवकांच्या मदतीने संशयित रुग्णांची त्वरीत तपासणी व संशयित रुग्णांची वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून निदान व उपचार सुरू करून संसर्गाची साखळी खंडित करण्यावर भर देण्यात येणार आहे. सहवासितांची तपासणी करून पात्र व्यक्तींना प्रतिबंधात्मक औषधोपचार (केमोप्रोफायलॅक्सिस) देण्यात येणार आहेत, अशी माहिती कुष्ठरोग सहाय्यक संचालक डॉ. महेंद्र चव्हाण यांनी दिली आहे. शरीरावर कोणताही लालसर फिकट बधिर (संवेदना नसलेला) चट्टा, तेलकट गुळगुळीत चकाकणारी त्वचा तसेच कानाच्या पाळीवर व शरीरावर गाठी येणे , हाताच्या बोटांमध्ये व पायाच्या पंज्यांमध्ये अशक्तपणा व कमजोरी येणे अशी कुष्ठरोगाची लक्षणे आहेत. लवकर निदान व लवकर उपचार केल्यास कुष्ठरोग पूर्णपणे बरा होऊ शकतो, विकृती टाळता येते आणि रुग्णांचे सामाजिक पुनर्वसन सुलभ होते, हा महत्त्वाचा संदेश समाजापर्यंत पोहोचवण्यासाठी नागरिकांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी नमन गोयल, जिल्हा आरोग्य अधिकारी आदी उपस्थित होते.

---

## नवापूर येथे युवकाचा मृतदेह आढळला

प्रतिनिधी । नवापूर

**शहरातील देवळफळी परिसरात युवकाचा मृतदेह आढळला. घातपाताची शक्यता पोलिसांनी फेटाळली. शहरातील देवळफळी भागात एका २८ वर्षीय युवकाचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात काही काळ चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, पोलीस तपासात आणि नातेवाईकांच्या जबाबातून हा कोणताही घातपाताचा प्रकार नसल्याचे स्पष्ट झाले आहे.**

नवापूरमधील भारतीय गणेश मंडळाच्या शेडखाली एका युवकाचा मृतदेह चादरीने झाकलेल्या अवस्थेत आढळून आला होता. सुरुवातीला युवकाचे हात-पाय बांधलेल्या स्थितीत असल्याची चर्चा असल्याने नागरिकांमध्ये विविध तर्कवितर्क लढवले जात होते. घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक अभिषेक पाटील यांनी पथकासह घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. तपासाअंती सत्य समोर दुपारी झालेल्या सखोल तपासाअंती मृताची ओळख पटली आहे. अक्षय रामजी मावची असे या युवकाचे नाव आहे. नातेवाईकांनी दिलेल्या माहितीनुसार, अक्षयला गेल्या काही काळापासून दारूचे व्यसन होते आणि त्याला सतत डोकेदुखीचा तीव्र त्रास जाणवत असे. पोलिस आणि नातेवाईकांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, या घटनेत कोणताही घातपात झालेला नाही. प्राथमिकरित्या हा मृत्यू शारीरिक व्याधी किंवा इतर नैसर्गिक कारणांमुळे झाल्याचा अंदाज वर्तवण्यात येत आहे.

# गर्जना महाराष्ट्र ग्रामीण पत्रकार संघाचा पदग्रहण सोहळा उत्साहात

## केंद्रीय कार्याध्यक्षपदी सागरभाऊ ओतारी, उत्तर महाराष्ट्र कार्याध्यक्षपदी मुराद पटेल, सचिव मंगल पाटील; जिल्हाध्यक्ष चेतन वाणी

प्रतिनिधी । जळगाव

**येथील गर्जना महाराष्ट्र ग्रामीण पत्रकार संघातर्फे रविवारी दि. १ फेब्रुवारी रोजी पद्मालय विश्राम गृहात विशेष कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमांमध्ये उत्तर महाराष्ट्र विभागीय अध्यक्षपदी वसंत दिलीपचंद पाटील, कार्याध्यक्षपदी मुराद पटेल तर सचिवपदी मंगल पाटील यांची, जिल्हाध्यक्ष म्हणून चेतन रवींद्र वाणी यांची तर शहराध्यक्ष म्हणून जितेंद्र कोतवाल यांची एकमताने निवड करण्यात आली. तसेच इतरही सदस्यांना पदाधिकारीपदी नियुक्त करण्यात आले.**



गर्जना महाराष्ट्र ग्रामीण पत्रकार संघातर्फे पद्मालय विश्राम गृहात रविवारी विशेष कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी मंचावर केंद्रीय अध्यक्ष नरेंद्र कदम, केंद्रीय कार्याध्यक्ष सागर ओतारी, उपाध्यक्ष रवींद्र पवार, केंद्रीय सचिव भगवान सोनार, खजिनदार ललित खरे, सदस्य गणेश पाटील, साक्री ता. धुळे येथील संघटनेच्या पदाधिकारी जोशीला पगारिया तसेच ज्येष्ठ पत्रकार चंद्रकांत यादव, डॉ. दिलीप तिवारी, राजेश यावलकर उपस्थित होते. सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते श्री गणेशाच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यानंतर प्रस्तावनेमधून, अध्यक्ष नरेंद्र कदम यांनी कार्यक्रम घेण्यामागील उद्देश्य स्पष्ट करून संस्थेची ध्येयधोरणे स्पष्ट केली.

यानंतर मान्यवरांनी आपल्या मनोगतातून संघटनेविषयी कौतुक करून पत्रकारांवर होणाऱ्या अन्यायाला संघटनेच्या माध्यमातून एकजुट दाखवून वेळोवेळी आवाज उठवू या असे सांगितले. यामध्ये जेष्ठ पत्रकार दिलीप तिवारी, चंद्रकांत यादव, राजेश यावलकर, जोशीला पगारिया, रवींद्र पवार यांनी मनोगत व्यक्त केले. पत्रकारांच्या समस्येसह पाल्यांच्या शिक्षण, रोजगार, आरोग्याच्या दृष्टिकोनातून संघटनेच्या माध्यमातून आपण सतत कार्यरत राहूया असेही आवाहन यावेळी मान्यवरांच्या वतीने करण्यात आले.

यावेळी विविध निवड प्रक्रिया जाहीर करून मान्यवरांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. यात उत्तर महाराष्ट्र विभागीय अध्यक्षपदी वसंतराव पाटील, कार्याध्यक्षपदी चाळीसगावचे मुराद पटेल, उपाध्यक्षपदी दीपक कुलकर्णी, सचिवपदी जळगाव तालुक्यातील मंगल पाटील, संघटकपदी राकेश विजय वाणी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच जळगाव जिल्हाध्यक्षपदी चेतन रवींद्र वाणी, जिल्हा कार्याध्यक्षपदी हेमंत सुरेश पाटील, जिल्हा सचिवपदी वसीम शब्बीर खान यांची एकमताने निवड करण्यात आली. जिल्हा उपाध्यक्षपदी धानोऱ्याचे प्रशांत सोनवणे, सुमित सुरेश देशमुख, लोहा-याचे दीपक वामन पवार, जिल्हा सहसचिव म्हणून राजेंद्र यु. पाटील, खजिनदार म्हणून पंकज शेटे, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख म्हणून विश्वजीत चौधरी यांची नियुक्ती झाली. जळगाव शहर अध्यक्षपदी जितेंद्र संतोष कोतवाल तर शहर कार्याध्यक्षपदी जकी अहमद, सचिव योगेश रमेश चौधरी यांची एकमताने नियुक्ती झाली. शहर उपाध्यक्ष म्हणून पवन खंबायत, नितीन पुंडलिक सोनवणे, निखिल अशोक मोरे, सहसचिवपदी नरेश प्रधान बागडे यांची नियुक्ती झाली.

तर शहर खजिनदार म्हणून गोकुळ सोनार, शहर संघटक म्हणून भूषण हंसकर, सहसंघटक म्हणून राजेंद्र रामराव पाटील तसेच सदस्य म्हणून इकबाल पटेल यांची निवड करण्यात आली आहे. या सर्व निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र मान्यवरांच्या हस्ते देऊन त्यांच्यावर आगामी काळात मोठी जबाबदारी टाकण्यात आली आहे.

सर्व पदाधिकाऱ्यांनी एकमताने, आम्ही संघटनेचे कार्य जोमाने पुढे नेऊ. पत्रकार व त्यांच्या कुटुंबीयांच्या कल्याणाच्या दृष्टिकोनातून विविध कार्यक्रमांची आखणी करू असे आश्वासन यावेळी दिले. सूत्रसंचालन भगवान सोनार यांनी केले. तर आभार विश्वजीत चौधरी यांनी मांडले. कार्यक्रमासाठी गर्जना महाराष्ट्र ग्रामीण पत्रकार संघटनेच्या विविध पदाधिकारी कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

### ➢ केंद्रीय कार्याध्यक्ष सागरभाऊ ओतारी यांचा गौरव




याप्रसंगी दै. शौर्य मराठीचे मुख्य संपादक सागरभाऊ ओतारी यांची गर्जना महाराष्ट्र ग्रामीण पत्रकार संघाच्या केंद्रीय कार्याध्यक्षपदी निवड करण्यात आली. सागरभाऊ ओतारी यांच्या मोठा जनसंपर्क, संघटनात्मक कौशल्य आणि पत्रकारांच्या प्रश्नांची जाण असल्याने ही निवड करण्यात आली आहे. या निवडबद्दल बोलतांना, सागरभाऊ ओतारी यांनी, गर्जना महाराष्ट्र ग्रामीण पत्रकार संघाचा राज्यभर विस्तार करत पत्रकारांच्या समस्या सोडवत त्यांना न्याय देण्यासाठी प्रयत्नशील राहिल अशी ग्वाही त्यांनी दिली.



### ➢ गर्जना महाराष्ट्र ग्रामीण पत्रकार संघटनेच्या बैठकीला उत्स्फुर्त प्रतिसाद

जळगावनंतर नाशिक, पुणे, मुंबई यास राज्यभरात गर्जना महाराष्ट्र ग्रामीण पत्रकार संघाचे संघटन वाढविण्यासाठी प्रयत्नशील राहणार आहे. तसेच दर महिन्याला मीटिंग घेण्यासंदर्भात चर्चा करण्यात आली. या संघटनेच्या बैठकीस जळगाव जिल्ह्याभरासह इतर तालुक्यातील पत्रकारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

# मोठा माळीवाडा परिसरात सिकलसेल सर्वेक्षण मोहीम; ग्रामीण रुग्णालयाच्या वतीने नागरिकांची तपासणी

प्रतिनिधी । धरणगाव

**शहरातील मोठा माळीवाडा परिसरात आज सिकलसेल आजाराच्या तपासणीसाठी विशेष सर्वेक्षण मोहीम राबविण्यात आली. धरणगाव ग्रामीण रुग्णालयाच्या वतीने आयोजित या उपक्रमात एमपीडब्ल्यू महेंद्र पंढरीनाथ माळी यांनी घरोघरी भेट देत नागरिकांची प्राथमिक तपासणी करून आवश्यक माहिती संकलित केली.**

सिकलसेल हा आनुवंशिक आजार असल्याने त्याची लवकर ओळख होणे अत्यंत गरजेचे आहे. या सर्वेक्षणाच्या माध्यमातून मोठा माळीवाडा परिसरात प्रत्येकांची नोंद घेण्यात आली. पुढील टप्प्यात संबंधित नागरिकांना वैद्यकीय तपासणी, उपचार व योग्य मार्गदर्शन देण्यात येणार आहे. या आरोग्य मोहिमेमुळे नागरिकांमध्ये सिकलसेलबाबत जनजागृती वाढण्यास मदत होत आहे. भविष्यातील गंभीर आजार टाळण्यासाठी हा उपक्रम उपयुक्त ठरणार आहे.

तरी शहर-परिसरातील ४० वर्षे वयाच्या आतील प्रत्येक नागरिकांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन ग्रामीण रुग्णालयाचे एम.पी. डब्ल्यू. कर्मचारी श्री. माळी यांनी केले.



# मुक्ताईनगरच्या शासकीय विश्रामगृहाची नवीन इमारत उद्घाटनाच्या प्रतीक्षेत

प्रतिनिधी । मुक्ताईनगर

येथील शासकीय विश्रामगृहात व्हीआयपी सूट तसेच वापरायला अन्य व्यक्तींसाठी दोनच सूट (खोल्या) आहेत. त्यामुळे बऱ्याचदा आरक्षण मिळत नाही किंवा सूट उपलब्ध नसल्याने व्यक्तींना परत जावे लागते.

आता नुकतीच बांधलेली नवीन इमारत, अद्ययावत, रंगरंगोटी होऊन उद्घाटनाच्या प्रतीक्षेत उभी आहे. ती लवकर वापरायला खुली करावी, अशी मागणी होत आहे. याबाबत माहिती अशी, येथील आ. चंद्रकांत पाटील यांच्या प्रयत्नाने शासकीय विश्रामगृहाच्या आवारातच मागील बाजूस अद्ययावत नवीन विश्रामगृह आकर्षक, अद्ययावत रंगकाम पूर्ण झालेली इमारत तयार आहे. सध्या येथे वापरायला जुन्या पद्धतीचे दोन सूट (खोल्या) आहेत. त्या फारशा स्वच्छ सुविधायुक्त नाहीत. बाजूला व्हीआयपी सूट आहे. ते आमदार, खासदार, मंत्री आदी व्हीआयपीसाठी राखीव असतात. मुक्ताईनगर शहर मध्यप्रदेश, विदर्भ सीमेवर आहे. बऱ्याचदा बाहेरगावाहून येणारे अधिकारी अथवा प्रतिष्ठित व्यक्तीला मुक्कामी थांबण्यासाठी जागा मिळत नाही किंवा सूट आरक्षितही करता येत नाही.

# साकरी येथे विद्यार्थिनी हत्याकांडप्रकरणी ग्रामसभेत महिला दक्षता समितीची स्थापना

प्रतिनिधी । भुसावळ

**तालुक्यातील साकरी येथे दि.२७ जानेवारी रोजी झालेल्या दोन अल्पवयीन विद्यार्थिनींच्या हत्याकांडाच्या पार्श्वभूमीवर गावात ३१ जानेवारी रोजी आयोजित करण्यात आलेल्या विशेष ग्रामसभेत काही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले.**

या ग्रामसभेत महिला दक्षता समिती स्थापन करण्याचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला. तसेच या प्रकरणाचा खटला प्रभावीपणे चालविण्यासाठी ज्येष्ठ सरकारी वकील ॲड. उज्ज्वल निकम यांची नियुक्ती करावी, अशी मागणी करण्यात आली. पंचायत समिती निरीक्षक सचिन पाठक यांनी याबाबत माहिती देताना सांगितले की, गावातील टवाळखोर प्रवृत्तीवर लक्ष ठेवण्यात येणार असून त्यांना समज देण्याचे काम महिला दक्षता समितीमार्फत केले जाईल. कारवाई येईल. गावात अशा प्रकारच्या घटना पुन्हा घडू नयेत, यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्याचा निर्णय ग्रामसभेत घेण्यात आला. यात महिलांनी गावात स्कार्फ वापरू नये आक्षेपार्ह वर्तन दिसल्यास दक्षता समिती अथवा पोलीसांशी संपर्क साधावा असे ठरले.

# चोपडा येथील प्रताप विद्यामंदिरात अग्निसुरक्षा प्रात्यक्षिक

प्रतिनिधी । चोपडा

**प्रताप विद्यामंदिर चोपडा येथे सकाळ विभागातील विद्यार्थ्यांसाठी अग्नी सुरक्षा प्रात्यक्षिकाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रात्यक्षिकांतर्गत विद्यालयाचे क्रीडा शिक्षक नरेंद्र एन.महाजन यांनी विद्यार्थ्यांना आगीचे प्रकार तसेच आग विझविण्याचे प्रकार यासंबंधीची सखोल माहिती देत डीसीपी, तसेच** CO2 FIRE EXTINGUISHER **यांचा वापर करून सॉलिड व लिक्विड फायर विझविण्याचे प्रात्यक्षिक करून दाखविले व विद्यार्थ्यांकडून करवून घेतले.**



आग लागली असता घाबरून न जाता अग्निशमन केंद्राला फोन करून कशा पद्धतीने माहिती द्यावी, तसेच आग लागू नये व लागल्यास कोणती काळजी घ्यावी यासंबंधीची सर्व माहिती विद्यार्थ्यांना याप्रसंगी देण्यात आली. सदर कार्यक्रमाला सकाळ विभागाचे पर्यवेक्षक पंकज नागपुरे, ए. एन. देसले, सुदर्शन महाजन, रोहन पाटील, किरण पाटील, निकिता गुजराती, रिटा हुंडीवाले, संमती जैन व देवेंद्र माळी यांच्यासह बीएड प्रशिक्षणार्थी शिक्षक शिक्षिका उपस्थित होते.

# सफाई कामगारांसोबत मैदानात उतरले नगरसेवक सुनील चौधरी

## माझा प्रभाग, माझी जबाबदारी म्हणत दिला तात्काळ दिलासा

प्रतिनिधी । धरणगाव

**धरणगाव नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्र. ८ चे नवनिर्वाचित नगरसेवक सुनील पंढरीनाथ चौधरी यांनी अल्पावधीतच आपल्या कामातून लोकांचा नगरसेवक अशी ओळख निर्माण केली आहे. नागरिकांच्या सुख-दुःखात प्रत्यक्ष सहभागी होत, केवळ आदेश देणारे नव्हे तर प्रत्यक्ष मैदानात उतरून काम करणारे नेतृत्व म्हणून ते पुढे येत आहेत.**



भावसार गल्ली परिसरातील गटारी अनेक दिवसांपासून तुंबलेल्या होत्या. साचलेले सांडपाणी, तीव्र दुर्गंधी व डास-मच्छरांचा वाढता प्रादुर्भाव यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला होता. या परिस्थितीची माहिती मिळताच नगरसेवक सुनील चौधरी यांनी क्षणाचाही विलंब न करता नगरपरिषद प्रशासनाशी संपर्क साधून सफाई कर्मचाऱ्यांना तातडीने भावसार गल्लीत बोलाविले. विशेष म्हणजे, केवळ सूचना देऊन थांबण्याऐवजी सुनील चौधरी स्वतः सफाई कामगारांसोबत उपस्थित राहून कामकाजावर लक्ष ठेवत होते. त्यांच्या देखरेखीखाली सर्व गटारी तळापर्यंत स्वच्छ करण्यात आल्या. साचलेले घाण पाणी वाहू लागले आहे. त्यामुळे परिसरात स्वच्छतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

त्यामुळे डासांमुळे होणाऱ्या आजारांचा धोका मोठ्याप्रमाणात कमी झाला आहे. या प्रभावी कार्यवाहीमुळे भावसार गल्ली परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त करत नगरसेवक सुनील चौधरी यांचे मनापासून आभार मानले. फोन केला आणि लगेच काम सुरू झाले, अशी भावना अनेक नागरिकांनी व्यक्त केली. नागरिकांच्या समस्या अधिक जलद मार्गी लागाव्यात, यासाठी नगरसेवक सुनील चौधरी यांनी चौधरी टेन्ट हाऊस, तलाठी गल्ली येथे जनसंपर्क कार्यालय सुरू केले आहे. मोबाईल क्रमांक ९८२३९८६४४९ / ७५८८०५२३२० वर थेट संपर्क साधण्याचे आवाहन त्यांनी केले आहे. माझ्या प्रभागातील प्रत्येक नागरिक माझा परिवार आहे.

त्यांच्या अडचणी सोडवणे हेच माझे कर्तव्य, असलल्याचे ठाम मत व्यक्त करत सुनील चौधरी यांनी लोकप्रतिनिधी म्हणून संवेदनशीलता आणि जबाबदारीचा आदर्श घालून दिला आहे. सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी नेहमी धावून येणारे, प्रत्यक्ष कामातून विश्वास निर्माण करणारे आणि विकासाला गती देणारे नेतृत्व म्हणून नगरसेवक सुनील चौधरी यांची ओळख दिवसेंदिवस अधिक बळकट होत आहे.

# मुक्ताई सरस प्रदर्शनाला केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांची भेट

प्रतिनिधी । मुक्ताईनगर

**भुसावळ येथे ग्रामविकास व पंचायत राज विभागामार्फत उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत ग्रामीण भागातील महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंचे जिल्हास्तरीय मुक्ताई सरस प्रदर्शन मोठ्या उत्साहात भरविले आहे.**

या प्रदर्शनास केंद्रीय राज्यमंत्री श्रीमती रक्षा खडसे यांनी भेट देऊन महिला बचत गटांच्या स्टॉलची पाहणी केली. यावेळी मंत्री श्रीमती खडसे यांनी महिला उद्योजिकांशी सविस्तर संवाद साधला. त्यांच्या कष्ट, आत्मनिर्भरतेची वाटचाल व उत्पादित वस्तूंच्या गुणवत्तेचे कौतुक केले. तसेच बचत गटांच्या महिलांनी तयार केलेल्या विविध वस्तूंची खरेदी करून महिलांना प्रोत्साहन दिले. बचत गटांच्या माध्यमातून स्थानिक उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देणे आणि महिलांच्या उद्यमशीलतेला चालना देणे हे या प्रदर्शनाचे मुख्य उद्दिष्ट असल्याचे मंत्री खडसे यांनी सांगितले. प्रसंगी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मिनल करणवाल, स्थानिक भाजप पदाधिकारी, शासकीय अधिकारी, कर्मचारी तसेच कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.